## नियमीत दिवाणी दावा क्र. 77/2006
## निशाणी क्र. 5 वरील आदेश

1. वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश 39 नियम 1, 2 प्रमाणे तूर्तातूर्त मनाई हुकूम मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

2. वादीची बाजू थोडक्यात खालील प्रमाणेः–

वादीचे वडील नामदेव हे दिनांक 06.10.2001 रोजी मयत झाले असून तिची आई कौसल्याबाई तीन महिन्यांपूर्वी मयत झाली आहे. नामदेव यास प्रतिवादी क्र. 1 ते 3 ही मुले व प्रतिवादी क्र. 4 व वादी या मुली आहेत. प्रतिवादी क्र. 5 ही प्रतिवादी क्र. 1 ची पत्नी असून प्रतिवादी क्र. 6 ही प्रतिवादी क्र. 3 ची पत्नी आहे. प्रतिवादी क्र. 7 हा प्रतिवादी क्र. 3 व 6 यांचा मुलगा आहे. मौजे आंडगांव (जेहूर) येथील जमीन गट क्र. 65 क्षेत्र 10 हे. 49 आर गट क्र. 42 क्षेत्र 84 आर व 20 खणांची घर मिळकत (सदर मिळकतींना यापुढे दावा मिळकती असे संबोधन्यात येईल). या वादी व प्रतिवादी यांच्या वडिलोपार्जित व एकत्र कुटूंबाच्या मिळकती आहेत. सदर मिळकतीच्या वादी प्रतिवादी यांच्यामध्ये वाटण्या झालेल्या नाहीत. वादीने दावा मिळकतींच्या वाटणी करून 1/6 हिस्स्याची मागणी केली असता प्रतिवादींनी त्यास नकार दिला व सदर मिळकती विक्री करण्याची धमकी दिली. दावा मिळकत गट क्र. 65 पैकी काही क्षेत्राचे प्रतिवादी क्र. 1 व 3 यांनी करून दिलेले खरेदीखत क्र. 2745/2007 व प्रतिवादी क्र. 5 ने करून दिलेले खरेदीखत क्र. 2744/2007 दि. 11.06.2007 रोजीचे वादीवर बंधनकारक नाही. प्रतिवादी हे दावा मिळकती हस्तांतरण करण्याच्या प्रयत्नात आहेत म्हणून वादींनी सदर अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

3. दाव्यातील समन्सची बजावणी झाल्या नंतर प्रतिवादी क्र. 1 व 5 यांनी याकामी हजर होवून अनुक्रमे निशाण 35 व 61 वर त्यांची कैफियत व म्हणणे दिले आहे. त्यांनी दाव्यातील नातेसंबंधाव्यतिरिक्तचा सर्व मजकूर चुकीचा असून तो मान्य नसल्याचे कथन केले आहे. त्यांनी पुढे असे म्हटले आहे की, वादींनी दाव्यामध्ये एकत्र कुटूंबाच्या सर्व मिळकती समाविष्ट केलेल्या नाहीत. प्रतिवादी क्र. 1 व 3 यांनी दावा मिळकतीपैकी काही क्षेत्राचे खरेदीखत क्र. 2745/2007 करून दिलेले नाही. तसेच प्रतिवादी क्र. 5 ने देखिल गट क्र. 65 चे खरेदीखत करून दिलेले नाही. त्यामुळे वादीस त्याबाबत हक्कज्ञापन मागण्याचा अधिकार नाही. प्रतिवादी क्र. 1 व 5 यांनी केलेले व्यवहार त्यांचे मिळकतीचे आहेत. त्याच्याशी वादीचा काही एक संबंध नाही त्यामुळे खरेदीखत क्र. 2744/2007 व 2745/2007 हे वादीवर बंधनकारक आहेत. मयत नामदेव याचे कुटूंबाच्या मौजे आडगाव येथील ग्रामपंचायत मिळकत क्र. 12, 23, 57, 112 व 113 या मिळकतींचा उल्लेख वादीने मुद्दाम टाळलेला आहे. कन्नड येथील जमीन गट क्र. 73, 86, 119, 149, 150 या मिळकती नामदेवच्या एकत्र कुटूंबाच्या मालकीच्या असून त्या प्रतिवादी क्र. 1 ते 3 यांच्या स्वकष्टार्जित मिळकती नाहीत. सदर मिळकतींव्यतिरिक्त एक ट्रॅक्टर, ट्रॉली, ट्रॅक्टरचे अवजारे, 16 ते 18 तोळे सोन्याचे दागिने व तांब्या पितळेची भांडी त्यांच्या कुटूंबाच्या मालकीची आहेत. वादीचा विवाह सुमारे 50 वर्षांपूर्वी झाला असून ती सुखाने नांदत आहे. तिला माहेरच्या कोणत्याही मिळकतीची कधीही गरज नव्हती व नाही. परंतु प्रतिवादी क्र. 3 ने संगनमत करून वादीस सदर दावा दाखल करावयास लावले. प्रतिवादी क्र. 1 चे सासरचे मंडळींनी कन्नड येथील सर्व्हे क्र. 35/1 ई प्लॉट क्र. 25 हा त्याचे नावे जावायास भूदान म्हणून विकत घेवून दिलेला आहे.

4. वादीने प्रतिवादी क्र. 1 व 5 यांना कधीही कोणत्याही मिळकतीची वाटणी करून मागितली नाही. तिने विनाकारण दावा दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. 1 ते 3 यांना वडीलांचे समक्ष देण्यात आलेल्या वाटपास वादीची संमती होती. प्रतिवादी क्र. 3 याने नामदेवच्या आजारपणाचा गैरफायदा घेवून सर्व कुटूंबाचा कारभार, सोने–नाणे व इतर जंगम मालमत्ता स्वतःच्या ताब्यात घेतली. प्रतिवादी क्र. 1 ते 3 चे वडिलांनी जून 1999 मध्ये वादी, प्रतिवादी क्र. 1 ते 4 व पत्नी कौसल्याबाई या सर्वांचे संमतीने प्रतिवादी क्र. 3 चे सांगण्याप्रमाणे मिळकतीचे वाटप करून दिले. सदर वाटणीचा तपशील रू. 10/–चे स्टॅंप वर नमूद करण्यात आला. त्याप्रमाणे ज्याचे त्याचे नावे फेरफार मंजूर झाला आहे. तेव्हा पासून सदर मिळकती ज्याचे त्याचे ताब्यात आहे. प्रतिवादी क्र. 1 हा अशिक्षित असून भोळसर असल्याने त्याने त्याचे हिस्स्यास आलेल्या मिळकतींपैकी आडगाव (जेहूर) येथील 8 हेक्टर जमीन पत्नी प्रतिवादी क्र. 5 हिचे नावे करून दिली आहे. प्रतिवादी क्र. 1 व 5 यांनी सदर जमीनीमध्ये सुधारणा करीत विहिर खोदली व पाईपलाईन केली व मोसंबीची 500 झाडे लावलेली आहेत. तसेच त्यामध्ये घर देखील बांधलेले आहे. वादीने एकत्र कुटूंबाच्या इतर मिळकतींची वाटणी न मागता जाणून बूजून दावा मिळकतींचीच वाटणी करून मागितलेली नाही. म्हणून त्यांनी सदर अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

5. दाव्यातील समन्सची बजावणी झाल्या नंतर प्रतिवादी क्र. 2 ने याकामी हजर होवून निशाण 32 वर कैफियत दिली आहे. त्याने दाव्यातील नातेसंबंधा व्यतिरिक्तचा सर्व मजकूर चूकीचा असून तो मान्य नाही असे कथन केले आहे. त्याने पुढे असेही म्हटले आहे की, वादीने दाव्यामध्ये एकत्र कुटूंबाच्या सर्व मिळकती समाविष्ट

केलेल्या नाहीत. वादीने दावा मिळकतींचे वर्णन चुकीचे दिले आहे. मौजे आडगांव (जेहूर) येथील जमीन गट क्र. 73, 86, 119, 149 व 150 या मिळकती नामदेवच्या कुटूंबाच्या मिळकती असून त्या प्रतिवादी क्र. 1 ते 3 यांच्या स्वकष्टार्जित मिळकती नाहीत. सदर मिळकतींव्यतिरिक्त एक ट्रॅक्टर, ट्रॉली ट्रॅक्टरची अवजारे, 16 ते 18 तोळे सोन्याचे दागिने व तांब्या पितळेची मोठी भांडी त्यांच्या कुटूंबाच्या मालकीची आहेत. प्रतिवादीचे वडील नामदेव हे वयोवृध्द झाल्यावर प्रतिवादी क्र. 3 ने त्यांचे आजारपणाचा गैरफायदा घेत सर्व कुटूंबाचा कारभार व मालमत्ता स्वतःच्या ताब्यात घेतली. प्रतिवादी क्र. 2 ने त्यात हिस्सा मागितला म्हणून त्याने वादीशी संगनमत करून तिला प्रस्तुतचा खोटा दावा दाखल करावयास लावले. वादीचा विवाह सुमारे 57–58 वर्षांपूर्वी झालेला असून तिला माहेरच्या कोणत्याही मिळकतीची कधीही गरज नव्हती व नाही. वादीने विनाकारण सदरचा दावा दाखल केला आहे. तिचा दावा मिळकतींमध्ये 1/6 हिस्सा नाही. वादीचे वडीलांनी तिला टाकळी (लो.) येथे 4 एकर जमीन पूर्वीच विकत घेवून दिली आहे. वादीने जाणून–बूजून एकत्र कुटूंबाच्या इतर मिळकतींचीच वाटणी न मागता दावा मिळकतींची वाटणी करून मागितली आहे. म्हणून त्यांनी सदर अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

6. दाव्यातील समन्सची बजावणी झाल्यानंतर प्रतिवादी क्र. 4 हिने याकामी हजर होवून निशाणी 45 वर कैफियत दिली आहे. तिने दाव्यातील दोन्ही पक्षातील नातेसंबंधाव्यतिरिक्तचा मजकूर चूकीचा असून तो मान्य नसल्याचे कथन केले आहे. तिने पुढे असेही म्हटले आहे की, कन्नड येथील जमीन गट क्र. 73, 86, 119, 149

व 150 व मौजे शिवूर येथील जमीन गट क्र. 1799 या मिळकती प्रतिवादी क्र. 1 ते 3 यांच्या स्वकष्टार्जित मिळकती आहेत. कन्नड येथील सर्व्हे क्र. 35/1/ई मधील प्लॉट क्र. 25 ही वडिलोपार्जित मिळकत असून त्यामध्ये तिचा व वादीचा प्रत्येकी 1/4 हिस्सा आहे. वादीने प्रतिवादींना दावा मिळकतीचे वाटप करून मागितले होते त्यावेळी प्रतिवादी क्र. 4 ने देखील तिचा सदर मिळकतीतील 1/6 हिस्सा मागितला होता परंतु त्याने त्यास नकार दिला. प्रतिवादी क्र. 1 ते 3 व 5 ते 7 हे आपसात संगनमत करून वादी व प्रतिवादी क्र. 4 यांना त्यांचा दावा मिळकतीतील हिस्सा देण्यास टाळाटाळ करीत आहेत. ते सदर मिळकती विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत. वादी व प्रतिवादी क्र. 4 यांना त्यांचे वडील मयत नामदेव यांनी अथवा प्रतिवादी क्र. 1 ते 3 यांनी आजपर्यंत कुठल्याही मिळकतीत हिस्सा दिलेला नाही. म्हणून प्रतिवादीने वादीचा दावा नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

7. दाव्यातील समन्सची बजावणी झाल्यावर प्रतिवादी क्र. 3, 6 व 7 यांनी या कामी हजर होवून देखिल कैफियत/म्हणणे दिले नाही. म्हणून सदर अर्ज त्यांच्या विरूध्द विनाकैफियत चालविण्यात आला.

8. दाव्यातील समन्सची बजावणी झाल्यानंतर प्रतिवादी क्र. 8 व 9 यांनी याकामी हजर होवून निशाण 59 वर त्यांचे कैफियत व म्हणणे दिले आहे. त्यांनी दाव्यातील सर्व मजकूर मान्य नसल्याचे कथन केले आहे. त्यांनी पुढे असेही म्हटले आहे की, वादी व प्रतिवादी क्र. 1 ते 4 यांचे वडील नामदेव यांनी त्याच्या हयातीत दि. 11.06.99 रोजी दावा मिळकती प्रतिवादी क्र. 1 ते 3 यांच्यामध्ये वाटून दिल्या व त्याअन्वये

वाटणीपत्रकाची यादी तयार केली. त्यांनी स्वतःच्या व पत्नीच्या नावे सदर मिळकती मध्ये कुठलाही हिस्सा ठेवला नाही. त्यामुळे वादीस दावा मिळकतींमध्ये हिस्सा मागण्याचा अधिकार नाही. पुढे वादी व प्रतिवादी क्र. 4 ची लग्ने हिंदु वारसा (सुधारीत) कायदा 1994 अंमलात येण्यापूर्वी झालेला आहे. दावा मिळकत घर क्र. 112 मधील दक्षिणेकडील निम्मा हिस्सा प्रतिवादी क्र. 8 ने प्रतिवादी क्र. 1 व 5 यांच्या कडून रक्कम रू. 45,000/– स दि. 11.06.2007 रोजी रजिस्टर्ड खरेदीखता आधारे खरेदी घेतला आहे आणि त्यास सदर दाव्या बाबत कल्पना नव्हती म्हणून तो सदर मिळकतीचा सद्हेतूपूर्वक खरेदीदार झाला आहे. त्यामुळे वादीस सदर घर मिळकतीमध्ये हिस्सा मागण्याचा अधिकार नाही. दावा मिळकती जमीन गट क्र. 65 पैकी 8 हेक्टर क्षेत्र प्रतिवादी क्र. 8 व 9 यांनी प्रतिवादी क्र. 1 व 5 यांच्याकडून दि. 11.06.2007 चे रजिस्टर्ड खरेदीखता आधारे रक्कम रू. 6,80,000/– स खरेदी घेतले आहे. त्यांना प्रस्तुत दाव्याबाबत माहिती नव्हती त्यामुळे ते सदर मिळकतीचे सद्हेतूपूर्वक खरेदीदार झालेले आहेत. त्यामुळे वादीस सदर मिळकती मध्ये हिस्सा मागण्याचा अधिकार नाही. सदर दोन्ही खरेदीखते वादीवर बंधनकारक आहेत. दावा दाखल करते वेळी दावा मिळकती या वादीच्या वडीलांच्या नव्हत्या व नाहीत. दाव्यास दि. 04.06.2006 रोजी कोणतेही कारण घडले नाही म्हणून प्रतिवादी क्र. 8 व 9 यांनी सदर अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली.

9. खालील मुद्दे विचारात घेउन त्याखाली दिलेल्या कारणांवरून त्यांचे निष्कर्ष पुढील प्रमाणे दिलेले आहेत.

| मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|
| 1. वादीने सकृतदर्शनी केस सिद्ध केली आहे काय? | – | होय. |
| 2. न्यायाचे समतोलत्व कोणाच्या बाजूला आहे? | – | वादीचे. |
| 3. आदेश काय? | – | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

:: कारणमिमासा ::

मुद्दा क्र. 1 ते 3 साठी :–

10. वादीने तिच्या अर्जासोबत तिचे शपथपत्र, गट क्र. 65 चे 7/12 उतारे , गट क्र. 42 चा 7/12 उतारा, नामदेवचे मृत्यु प्रमाणपत्र निशाणी 4 सोबत व खरेदीखत क्र. 2744/2007 व 2745/2007 च्या प्रमाणित प्रती (नि.क्र. 40/1 व 40/2) हजर केल्या आहेत. याउलट प्रतिवादींनी कुठलाही कागदोपत्री पुरावा याकामी दाखल केलेला नाही. निशाण 4/1 वरील गट क्र. 65 चे 7/12 उता–यांचे अवलोकन केले असता दावा मिळकत गट क्र. 65 ही नामदेव विठोबा, प्रतिवादी क्र. 1, 5 व 6 यांचे नावे मालकी व वहितीच्या रकान्यात नोंद असल्याचे दिसून येते. गट क्र. 42 चे 7/12 उता–याचे अवलोकन केले असता जमीन गट क्र. 42 ही प्रतिवादी क्र. 7 चे नावे मालकी व वहिवाटीच्या रकान्यात नोंद असलेचे दिसते. तसेच सन 2005 व 2006 चे 7/12 उता–यामध्ये सदर मिळकत प्रतिवादी क्र. 5 व 6 चे नावे नोंद असल्याचे दिसते. निशाण 40/2 वरील खरेदीखताच्या प्रमाणित प्रती सोबतचा दावा घर मिळकत क्र. 112 चे घराचे उता–याचे अवलोकन केले असता सदर मिळकत प्रतिवादी क्र. 1 चे नावे व भोगवटादार म्हणून नोंद असल्याचे दिसून येते. वादीने दावा मिळकती या वादी व प्रतिवादींच्या एकत्र कुटूंबाच्या वडिलोपार्जित मिळकती आहेत असे कथन केलेले आहे. प्रतिवादींनी सदर

मिळकतींची वादी व प्रतिवादी क्र. 1 ते 4 चे वडील नामदेव यांनी त्यांचे हयातीत प्रतिवादी क्र. 1 ते 3 मध्ये वाटणी करून दिल्याचे अभिकथित केले आहे. परंतु त्याबाबत त्यांनी कुठलाही सबळ पुरावा याकामी दाखल केलेला नाही. प्रतिवादींचे कथनाप्रमाणे दावा मिळकती या नामदेवच्या कुटूंबाच्या मालकीच्या असून त्याने स्वतः सदर मिळकतींचे वाटप केले आहे. यावरून दावा मिळकती या वादी प्रतिवादी यांच्या वडिलोपार्जित मिळकती आहेत ही बाब स्पष्ट होते. त्यामुळे सकृतदर्शनी दावा मिळकतीमध्ये वादीचा हिस्सा असणे स्वाभाविक वाटते. वादीचे दावा मिळकतीमधील नक्की हिस्स्याबाबतचा निर्णय दाव्याचा अंतिम निकाल करतेवेळी होईल. दावा मिळकतीची वाटणी वादीचे संमतीने झाले बाबतचे प्रतिवादीचे विधानापुष्ठर्थ्य कुठलाही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर आलेला नाही. याउप्पर सदर मिळकतींचे वाटपाबाबत कुठलाही सकृत दर्शनी पुरावा अभिलेखावर आलेला नसल्याने आजमितीस दावा मिळकतींचे प्रतिवादी क्र. 1 ते 4 यांनी हस्तांतरण करणे योग्य होणार नाही. दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत त्यांना सदर मिळकती हस्तांतरण करणेपासून रोखने योग्य व न्यायोचित ठरेल. अशा परिस्थितीत प्रतिवादीस सदर मिळकतीत हस्तांतर करणेपासून प्रतिबंध करणे योग्य व न्यायोचित ठरेल. एकंदरीत वस्तुस्थिती व अभिलेखावरील पुरावा विचारात घेता वादीने सकृतदर्शनी केस सिद्ध केली आहे. न्यायाचे समतोलत्व वादीच्या बाजूने आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. 1 ते 4 विरूद्ध मनाई हुकूम न दिलेस वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल असे दिसते. म्हणून वादी दावा मिळकतीबाबत तूर्तातूर्त मनाई हुकूम मिळणेस पात्र आहे. वरील सर्व कारणांकरीता मुद्दा क्र. 1 व 2 चे निष्कर्ष त्याअन्वये दिले आहेत व मुद्दा क्र. 3 चे निष्कर्षाप्रत खालील आदेश पारीत करण्यात येतो.

निशाण 5 वरील आदेश
नि.दि.दा.क्र. 77/2006

## आदेश

1. अर्ज मंजूर करणेत येतो.

2. प्रतिवादी क्र. 1 ते 4 यांनी दावा मिळकतींचे विक्री, गहाण, बक्षीस किंवा अन्य प्रकारे स्वतः अथवा इतरांमार्फत हस्तांतरण करु नये असा तूर्तातूर्त मनाई हुकूम सदर दाव्याचा निकाल होईपर्यंत देण्यात येतो.

3. वादीने सदर दावा त्वरित चालवावा असे निर्देशित करणेत येते.

स्वाक्षरीत/–
(राजश्री मो. परदेशी)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कन्नड.

दिनांकः 26.10.2007